सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!
Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/
RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २६३ | सोमवार, दि. १५ जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४७५००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३५७००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११२१००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २४६०/-
भाव प्रती १० ग्राम

आजचे
अभीष्टचिंतन


श्री. गोपाल चौधरी
अमळनेर

# मनमानी पद्धतीने ठेकेदारांची केली अदा बिले...! बचतीच्या नावाखाली मात्र आवर्तन नाकारले...!!

## आता भरमसाठ पाणी पट्टी भरूनही अमळनेरकरांना पाणी देईल कोण ?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

**अमळनेर : पालिकेने काटकसरीचे धोरण जरूर स्वीकारले पाहिजे होते. मात्र काटकसर कोठे करावी? का करावी? व केव्हा करावी? याचे तारतम्य ठेवणेही गरजेचे असते. या आर्थिक वर्षात कोट्यवधी रुपयांची ठेकेदारांची बिले अदा करताना पालिकेने कोणते मापदंड वापरले? ते सर्वांना माहीत आहे. बिले अदा करताना काटकसरीचे धोरण वापरले असते आणि आवर्तन घेतले असते तर आज अमळनेरकरांसमोर पाण्याचे भीषण दुर्भिक्ष्य निर्माण झाले नसते. मात्र भरमसाठ पाणीपट्टी भरणाऱ्या अमळनेकरांना पाणी मिळावे म्हणून बचतीच्या नावाखाली चक्क आवर्तनच नाकारले गेले.पालिकेच्या करंटेपणामुळे व नियोजनाचा बोजवारा आणि दूरदृष्टीच्या अभाव असल्याने आता अमळनेरकरांसमोर पिण्याच्या पाण्याचे मोठे संकट उभे ठाकले आहे. त्याचे कारण म्हणजे जिथून अमळनेर शहराला पाणी पुरवठा होतो त्या जळोद गावाच्या तापीपात्रात आता मोठ्या मुश्किलीने आठवडाभर अमळनेरकरांना पुरेल इतकाच जलसाठा शिल्लक राहिला आहे.**



अमळनेर पालिका नागरिकांना पाणी पाजते म्हणजे फार मोठे उपकार करते असे नाही. भरमसाठ पाणीपट्टी भरणाऱ्या नागरिकांचा तो मूलभूत हक्कच आहे. हल्ली नागरिकांच्या पाणी प्रश्नाकडे ज्या गंभीरतेने दूरदृष्टीपणाने आणि नियोजन पद्धतीने लक्ष देणे गरजेचे होते व आहे तसे मुळीच घडताना दिसत नाही. दीर्घकाळापासून अल निनो आणि विविध कारणास्तव पावसाळ्याबाबतचे अनेक नकारात्मक संकेत मिळत आहेत. मात्र या संकेतांकडे लक्ष न देता पालिकेने काटकसरीच्या नावाखाली आवर्तन घेणे नाकारले आहे. आवर्तन घेतले असते तर अजून बरेच दिवस अमळनेरकरांसमोर पाण्याची समस्या निर्माण झाली नसती. हल्ली पालिकेत कोणाचाच पाय कोणाच्या पायात नाही हे आता लपून राहिलेले नाही. राज्यकर्त्यांना हेही माहीत आहे की अमळनेरकर जनता अत्यंत सोशिक आहे. जनतेला कोणत्याही सोयी-सवलती दिल्या नाहीत, पाणी दिले नाही तरी कोणी रस्त्यावर येत नाही, कोणी जाब विचारत नाही. त्यामुळे राज्यकर्ते बिनधास्त आहेत. अमळनेरकरांसमोर हल्ली पाण्याची समस्या निर्माण झाली आहे. त्यासाठी राज्यकर्त्यांचे ढिसाळ नियोजन जितके कारणीभूत आहे तितकीच अमळनेरकर जनतेची शांत प्रवृत्ती व सारे काही सहन करण्याची सवय देखील कारणीभूत आहे.

नेतेमंडळी फक्त एकमेकांवर आरोप करणे व एकमेकांकडे बोट दाखवणे यातच दंग आहेत. पालिकेतून जी धडाधड बिले अदा झाली त्या बिलांचे पोस्टमार्टम केल्यास अनेक धक्कादायक सत्य व तथ्य बाहेर पडतील. विरोधक वारंवार या बिलांबाबत पालिकेकडे मागणी करतात.मात्र कुणाला किती लाखांची/ कोटींची बिले केव्हा, कशी व का दिली? याबाबत पालिका माहिती देत नाही. नगराध्यक्ष डॉ. परीक्षित बाविस्कर यांचा हल्ली कोंडमारा झालेला आहे. त्यांचा मुळातच निरागस चेहरा व त्यांची अगतिकता पाहून त्यांच्यावर आता विरोधकांनीही रागावणे बंद केले आहे. मुख्याधिकारी गणेश शिंदे यांचाही चेहरा अत्यंत साधा- भोळा, गरीब आणि निरुपद्रवी आहे. त्या चेहऱ्याचा पुरेपूर लाभ घेऊन, त्यांच्यावर कोण आणि कसे दबाव आणते हे सारे रडवेल्या चेहऱ्याने सांगून ते जाब विचारणाऱ्या किंवा दरडावणाऱ्याला लीलया शांत करतात. माजी आमदार शिरीषदादा चौधरी यांना राज्यकारभाराचा व पालिकेचा दीर्घानुभव आहे. मात्र तेही लोकाभिमुख आणि पाण्यासारख्या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर कोणतीही निर्णायक भूमिका घेताना दिसत नाहीत. आमदार अनिलदादा पाटील यांनी आता स्वतःहून पुढे येऊन पाणी प्रश्नावर ठोस भूमिका घ्यावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. मात्र तसेही घडताना दिसत नाही. पालिका कर्मचारी त्यातही खास करून पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी आणि ठेकेदार यांच्यात कुठलाही समन्वय दिसत नाही. त्यांच्यावर कोणाचाही प्रभावी वचक राहिलेला नाही. या सर्वांचे भोग मात्र निरपराध असलेल्या अमळनेरकर जनतेला भोगावे लागत आहेत. पाणी पुरवठ्याच्या समस्येवर पालिका, आजी-माजी आमदार, नगरसेवक, मुख्याधिकारी आणि कर्मचारी यांच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. आता पाणी समस्या इतकी बिकट झाली आहे, इतकी गळ्याशी आली आहे की आता ही मंडळी काही फार दिवे लावेल असे दिसत नाही, असाच निराशेचा सूर आता जनतेतून उमटू लागला आहे. आता जनता जनार्दनानेच त्यांच्यासाठी या सर्वांना जाब विचारणे गरजेचे आहे. यासाठी काही जागरूक मंडळी मंथन करीत आहेत.पब्लिक प्रेशर ही लोकशाहीतील खूप मोठी शक्ती असते. या शक्तीचा वापर होत नसल्याने शहराची व पाणी प्रश्नाची दुर्दशा झालेली आहे, याची आता अनेकांना जाणीव होऊ लागली आहे. आता तरी जनतेने जागे व्हावे, एकत्रित यावे आणि कोणाच्याही राजकीय नेतृत्वाशिवाय स्वतःच्या हक्कासाठी मोठे जनआंदोलन उभारावे.पाणीटंचाईसारख्या भीषण समस्येला वाचा फोडण्यासाठी अशीच सद्यःस्थिती निर्माण झाली आहे.

> दोन दिवसांआड पाणीपुरवठ्याचा वादा करणारा दादा आता कुठे गेला? दुरुस्ती, नवीन कामाच्या नावाखाली व्हॉल्व्ह बंद केले जातात. अमळनेरची जनता वाऱ्यावर आहे याचीच खंत वाटते. शेवटी निर्णय जनतेचा होता. पाणी उपलब्ध असूनही नियोजन नाही. नियंत्रण सुटले आहे. आता पालिकेवर वेळप्रसंगी मोर्चा काढावा लागेल.
> **– माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील**

> लेबर कॉन्ट्रॅक्टर जुना आहे. तीनदा ठेका रद्द झाला. आचारसंहितेनंतर नवीन ठेकेदार बदलेल तेव्हा परिस्थिती बदलेल. अभियंता बदलला गेला. अनेकदा व्होल्टेज ब्रेकडाऊन होतो. अनेक अडचणी येत आहेत. तापीतील १४ बोअर सुरू आहेत. वेळप्रसंगी आवर्तन घेऊ.
> **– डॉ. परीक्षित बाविस्कर, नगराध्यक्ष, अमळनेर**

> पालिका कर्मचारी, अधिकारी, खासगी कर्मचारी यांच्यात समन्वय नाही. दोन-तीनदा बैठका घेतल्या. व्हॉल्व्हमन बदलले तरी गोंधळ कायम आहे. सत्ताधाऱ्यांनी काटकसर करण्यासाठी आवर्तन नाकारले. आता जूनमध्ये आवर्तन मिळणार नाही. व्हॉल्व्हमन किंवा कर्मचाऱ्यांबद्दल खोडसाळपणाची तक्रार आली तर कारवाई करू.
> **– गणेश शिंदे, पालिका मुख्याधिकारी, अमळनेर.**

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**
स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदे शीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

**अधिक मासात सोमवती अमावास्येचा यंदा ३० वर्षांनंतर योग!**

**अधिक मास सोमवती अमावास्येचे महत्त्व, पूजाविधी आणि कथा**

**सोमवती अमावास्या २०२६ : यंदाचा अधिक मास आज संपणार**

पान ४ वर

# प्रांताधिकाऱ्यांकडून छापा; वाळूचे दोन ट्रॅक्टर पकडले

## हिंगोणे शिवारातूनही पकडण्यात आला ३० ब्रास साठा

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : वाळूचे ठेके बंद झाल्यानंतर देखील जळोद येथील तापी नदीपात्रातून अवैध वाळू वाहतूक सुरूच असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्याची गंभीरतेने दखत घेत उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी शनिवार, दि. १३ जून रोजी मध्यरात्री छापा घालून वाळूच्या दोन ट्रॅक्टरवर कारवाई केली आहे.

प्रांताधिकारी भंगाळे यांनी १३ जून रोजी मध्यरात्री गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर स्थानिक तलाठ्याला न कळवताच कुऱ्हे खुर्द येथील ग्राम महसूल अधिकारी अमोल पाटील यांना सोबत घेऊन जळोद येथील तापी नदीपात्रात छापा घातला असता त्यांना नितीन चंद्रशेखर पाटील (रा. अमळगाव) हा ट्रॅक्टर क्रमांक एमएच १९- डीव्ही ४६२२ आणि जळोद येथील पंकज रवींद्र सावळे हा विना नंबरच्या ट्रॅक्टरमधून जळोद ते खवशी रस्त्यावर अवैध वाळू वाहतूक करताना आढळून आला. त्यामुळे भंगाळे यांनी तहसीलदार रूपेशकुमार सुराणा व पळासदळे येथील ग्राम महसूल अधिकारी पी. एस. केदार यांना त्वरित बोलावून दोन्ही ट्रॅक्टरचा पंचनामा करून ट्रॅक्टर तहसील कार्यालयात आणून ते जमा केले. दोन्ही ट्रॅक्टरवर कायदेशीर कारवाई करून दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे तहसीलदार सुराणा यांनी सांगितले. त्याचप्रमाणे बोरी नदीपात्रात देखील फापोरे, हिंगोणे या गावांच्या शिवारात अवैध वाळू उत्खनन होत असल्याची माहिती मिळताच १३ जून रोजी दुपारी भंगाळे आणि ग्राम महसूल अधिकारी पाटील यांनी अचानक छापा टाकला असता काही लोकांनी तत्काळ माहिती कळविल्याने नदीपात्रात उत्खनन करणाऱ्यांनी तेथून पलायन केले. मात्र, घटनास्थळी सुमारे ३० ब्रास वाळूसाठा आढळून आला. अमळनेर शहराचे मंडळाधिकारी धनराळे यांना वाळूसाठ्याचा पंचनामा करून त्याची ताबा पावती तेथील पोलीसपाटील आणि कोतवाल यांच्या ताब्यात देऊन साठ्यावर लिलाव होईपर्यंत लक्ष ठेवण्यास सांगितले आहे.

> ***अमळनेर तालुक्यातील कोणत्याही गावाच्या शिवारात अवैध वाळू उत्खनन होत असल्याचे आढळून आल्यास संबंधितांवर कठोर स्वरूपाची कारवाई केली जाईल.***
> ***– मयूर भंगाळे,***
> *उपविभागीय अधिकारी तथा प्रांताधिकारी, अमळनेर.*

### मंत्रिमंडळातील अर्थ खाते वाटप...

# शिवसेनेची ‘चिवसेना’ करणाऱ्यांनी आम्हाला शिकवू नये



## शिवसेना खासदार राऊतांच्या टीकेला आमदार अनिलदादा पाटलांचे सडेतोड उत्तर

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : राज्यात सध्या मंत्रिमंडळातील अर्थ खात्याच्या वाटपावरून सत्ताधारी आणि विरोधक यांच्यामध्ये जोरदार कलगीतुरा रंगला आहे. ‘राज्यात अर्थ खाते सांभाळता येण्यासारखा एकही सक्षम नेता नाही,’ या शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) खासदार संजय राऊत यांच्या विधानाचा राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजितदादा पवार गट) माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी तीव्र शब्दांत समाचार घेतला आहे.

“राऊतांची टीका पूर्णपणे ‘अर्थहीन’ असून ज्यांनी मूळ शिवसेनेची आज ‘चिवसेना’ करून ठेवली आहे त्यांनी आम्हाला सल्ले देऊ नयेत,” अशा शब्दांत अनिलदादांनी जळगावातून राऊतांना जोरदार घरचा आहेर दिला.

प्रसारमाध्यमांशी बोलताना अनिलदादांनी राऊत यांच्यावर बोचरी टीका केली. ते म्हणाले, “संजय राऊत यांना मागच्या इतिहासाचा विसर पडलेला दिसतो. महाविकास आघाडीचे सरकार असताना आणि उद्धव ठाकरे स्वतः मुख्यमंत्री पदावर असताना ते या पदासाठी किती सक्षम आहेत, याबद्दल माध्यमांमध्ये सातत्याने कशी चर्चा रंगत होती, हे उभ्या महाराष्ट्राने पाहिले आहे. त्यामुळे स्वतःचा इतिहास आधी तपासावा. राज्याच्या मंत्रिमंडळात अर्थ खाते कोणाला द्यावे किंवा कोणाकडे सोपवू नये, हा पूर्णपणे राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा विशेषाधिकार आहे. निर्णय घेण्याची ती क्षमता मुख्यमंत्र्यांकडे आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या अधिकारांवर आणि महायुतीच्या अंतर्गत बाबींवर बोलण्याचा संजय राऊत यांना कोणताही नैतिक अधिकार नाही.”

राऊत रोज सकाळी उठून महायुती सरकारवर जी फुकटची चिखलफेक करत असतात, त्याला आता जनताही कंटाळली आहे. राऊत यांनी सरकारला फुकटचे सल्ले देण्यापेक्षा स्वतःचा उरलेला पक्ष कसा सांभाळायचा आणि पक्ष आणखी किती फुटण्यापासून कसा वाचवायचा, याकडे आधी लक्ष द्यावे, असा टोलाही अनिलदादांनी शेवटी लगावला. अनिलदादांच्या या थेट विधानामुळे जळगावसह राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे आहेत.

# ‘जलसंपदा’चे सचिव डवलेंकडून ‘पाडळसरे’ची पाहणी

## पाडळसरे धरण जनआंदोलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन दिले निवेदन

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

अमळनेर : तालुक्यातील तापी नदीवर बांधण्यात येत असलेल्या निम्न तापी प्रकल्पांतर्गत पाडळसरे धरणाची पाहणी करण्यासाठी राज्याचे जलसंपदा प्रकल्प व विकास विभागाचे सचिव एकनाथ डवले नुकतेच आले होते. यावेळी पाडळसरे धरण जनआंदोलन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन उत्तर महाराष्ट्रातील या प्रमुख प्रकल्पाच्या कामाला प्राधान्य देऊन गती दिली जावी, अशी मागणी करीत निवेदन दिले.

याप्रसंगी डवले यांनी प्रकल्पाचा सविस्तर आढावा संबंधित अधिकाऱ्यांकडून घेत धरणाची पाहणी केली. त्यानंतर पाडळसरे धरण जनआंदोलन समितीचे प्रमुख तथा माजी नगराध्यक्ष सुभाष चौधरी, अर्बन बँकेचे संचालक रणजीत शिंदे, प्रा. सनील पाटील, पदाधिकारी रवींद्र पाटील, नगरसेवक प्रताप साळी, प्रा. भरतसिंग परदेशी आदींनी त्यांना निवेदन देत तापी नदीवर पाडळसरे येथे १९९९ पासून निम्न तापी प्रकल्पाची पायाभरणी झाली असली, तरी तत्कालीन राजकीय अनास्था, अपुरा निधी आणि नियोजनाचा अभाव यामुळे या प्रकल्पाचे काम तब्बल अडीच दशकांपासून कासव गतीमुळे सुरू असल्याने रखडलेला आहे. धरणाच्या प्रस्तावित लाभक्षेत्रातील परिसर वर्षानुवर्षे अवर्षणग्रस्त असून धरणाच्या कामाला प्रशासनाने प्राधान्यक्रम द्यावा. धरणात लवकर पाणी अडवायला हवे यासाठी बांधकामासह पुनर्वसनाचे कामही गतीने पूर्ण व्हावे, असे यावेळी समितीच्या पदाधिकाऱ्यांनी डवले यांना सांगितले.

शेतकऱ्यांचे व विस्थापितांचे प्रश्न स्थानिक पातळीवर सुटण्यासाठी धरणाच्या साईटवर प्रकल्प कार्यालय झाले पाहिजे. भूसंपादन कामातील अनियमितता असून त्यामुळे प्राप्त होणारा निधी शासनाच्या धोरणानुसार कामात येत नाही. असे यावेळी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आधी धरणाचे बांधकाम, भूसंपादन, पुनर्वसन व उपसा सिंचन योजनेचे काम गतिमानतेने व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करीत जलसंपदा विभागातील सचिव पातळीवरील अधिकारी पाडळसरे प्रकल्पाच्या पाहणीसाठी धरणाच्या कामावर प्रथमच आल्यामुळे समितीने डवले यांचे आभार मानले. याप्रसंगी समितीचे प्रसाद चौधरी, सुशील भोईटे, गणेश कुंवर, दीपक भोई, ॲड. विजय देवरे, एन. के. पाटील, ज्ञानेश्वर वारूळे आदींसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी अधीक्षक अभियंता गोकुळ महाजन, निम्न तापी प्रकल्प कार्यालयाचे अभियंता कडलग यांच्यासह विभागातील संबंधित अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**अमळनेर : जलसंपदा विभागाचे सचिव एकनाथ डवले यांनी नुकतीच पाडळसरे धरणाला भेट दिली. याप्रसंगी त्यांना निवदेन देताना धरण जनआंदोलन समितीचे प्रमुख तथा माजी नगराध्यक्ष सुभाष चौधरी, अर्बन बँकेचे संचालक रणजीत शिंदे, प्रा. सनील पाटील, पदाधिकारी रवींद्र पाटील, नगरसेवक प्रताप साळी, प्रा. भरतसिंग परदेशी आदी.**

## संपादकीय

# नियोजनाची घागर उताणी

जूनच्या मध्यापर्यंत मॉन्सूनची चाहूल न लागल्याने आणि आणखी काही दिवस तरी पावसाची शक्यता नसल्यामुळे राज्यापुढे दुष्काळी स्थितीचे आव्हान उभे आहे. गेल्या वर्षी अतिवृष्टीमुळे धरणे काठोकाठ भरल्यानंतर सहा-सात महिन्यांतच ही वेळ का यावी, हा प्रश्न पडणे साहजिकच. जलसाठ्यांच्या व्यवस्थापनातील अपयश, हे त्याचे सरळसरळ उत्तर. पुणे, मराठवाडा, विदर्भ आणि नाशिक या विभागांतील धरणे जवळजवळ रिकामी झाली आहेत. त्यामुळे नव्या युगातील या 'मंदिरां'च्या पोटातील प्राचीन मंदिरे आणि गावांचे अवशेष पृष्ठभागावर येत आहेत. बहुधा कोरड्या न पडणाऱ्या कोयना धरणातही केवळ नऊ अब्ज घनफूट (टीएमसी) इतकाच साठा शिल्लक आहे. त्यामुळे वीजनिर्मिती जवळपास थंडावली असून, दमदार पाऊस झाला नाही, तर सातारा, सांगली आणि सोलापूर जिल्ह्यांच्या अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या टंचाईची भीती आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सरकारी उपाययोजना सुरू होतीलच; पण त्यापूर्वी गेल्या वर्षभरात धरणांमधील पाण्याचा विनियोग कसा केला, आणि आताच ही वेळ का आली, याची झाडाझडती घेऊन जनतेसमोर सत्य मांडणे आवश्यक आहे. नागपूर, छत्रपती संभाजीनगर, जालना-परभणी आणि खानदेशातील अनेक शहरांमध्ये आठवड्यातून एक-दोनदाच पाणी येते. खरे तर १५ जुलैपर्यंत पिण्यासाठी पुरेल एवढा जलसाठा राखून ठेवण्याचे नियोजन जलसंपदा विभाग आजवर करत आला आहे. मग दीड महिना आधीच ही परिस्थिती उद्भवली; म्हणजेच उपलब्ध पाण्याचे नियोजन आणि वितरणात काही तरी चुकते आहे, हे नक्की.

मुख्य अडचण जलसाठे राखणारा जलसंपदा विभाग आणि शहरात पाणीवितरण करणारी महापालिका यांच्यातील समन्वयाच्या अभावात आहे. पुण्याच्या पाण्यात ४० टक्के गळती असल्याची कबुली पूर्वी महापालिका आयुक्तांनी दिली होती; ती दूर करण्यासाठी काय पावले उचलली, याचे उत्तर मिळालेले नाही. पूर्वी कालव्यातून पाणीपुरवठा करताना पाण्याची गळती-वाफ होते, असे सांगितले जाई. आता महापालिका शंभर टक्के पाणी जलवाहिनीतून घेते, त्यामुळे तोही प्रश्न राहिला नाही. अशा वेळी 'ग्रामीण विरुद्ध शहरी' असा वाद जाणीवपूर्वक पेटवून दिला जातो. खरे तर पाऊस कमी होणार, याचे अंदाज दोन महिन्यांपूर्वीच आले असतानाही उन्हाळ्यात कालव्यातून पाणी का सोडले गेले आणि जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या आचारसंहिता काळात कोणाच्या सूचनांवरून पाणी सोडले, अशा प्रश्नांची उत्तरे नागरिक मागत आहेत. पुण्यात दोन-चार टीएमसी पाण्यावरून वाद आहेत; उजनीची कथा वेगळीच आहे. राज्यातील सर्वांत मोठे, शंभर टीएमसी क्षमतेचे हे धरण पूर्ण भरते आणि वर्षात ते रिकामेही केले जाते; त्याची कुठेही हाक ना बोंब! त्याच धरणावर अवलंबून असलेल्या सोलापुरात मात्र अजूनही चार-पाच दिवसांनीच पाणी मिळते. दररोज पाणीपुरवठ्याच्या आश्वासनांना भुलून नागरिकांनी सत्तांतरही केले; पण दोन निवडणुकांनंतरही पाण्याच्या स्थितीत थेंबभराचाही फरक नाही.

जून महिन्याच्या सुरूवातीलाच अनेक गावे-शहरांमध्ये टँकरने पाणीपुरवठा सुरू झाल्याने टँकर माफियांचेही फावले आहे. टँकरमुक्त महाराष्ट्राच्या घोषणा गेली तीन दशके ऐकू येत आहेत; पण पाऊस कमी होवो की अधिक, अद्याप तरी त्यातून महाराष्ट्राची सुटका झालेली नाही. बेसॉल्ट खडकांनी बनलेल्या महाराष्ट्राच्या बहुसंख्य भागांत पाणी साठवणे आणि सिंचनावर मर्यादा आहेत. अशा स्थितीत उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन हाच मार्ग उरतो. 'जलयुक्त शिवार' सारख्या योजना पूरक म्हणून महत्त्वाच्या आहेत, मात्र दुष्काळ मुक्तीचा तो मुख्य उपाय नव्हे. पर्जन्य जलसंचय करून भूजलाच्या साठ्यात भर घालणे किंवा शहरांतील वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करण्यासाठी कायदे-नियम सारे तयार आहेत. मात्र, त्याच्या अंमलबजावणीचाही भीषण दुष्काळ आहे. पाण्याच्या पुनर्वापराचे प्रमाण दहा टक्केही नाही. शहरांतील वाहिन्यांची दुरुस्ती, धरणांतील गाळ काढणे, गळती-पाणीचोरी रोखणे अशा अनेक उपाययोजना कागदावरच आहेत. योजनांचा अवाढव्य खर्च, तंत्रज्ञान अशा अनेक अडचणी त्यामागे आहेत; मात्र मुख्य अडसर आहे राजकीय इच्छाशक्तीचा. तो दूर होईल तो सुदिन!

# यशवंतराव चव्हाणांनी केले होते अत्रेंना मोठ्या मनाने माफ!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

प्रल्हाद केशव अत्रे यांनी एकवेळ यशवंतराव चव्हाण यांना निपुत्रिक म्हटले. ही टीका अत्यंत वाईट तर होतीच. पण १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण झाल्यावर केली होती. तरीही यशवंतरावांनी एक चकार शब्द काढला नाही. त्यांनी एक फोन केला आणि अत्रेंना खुलासा करून म्हणाले, 'माझी पत्नी वेणू १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात असताना तिच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. त्यात तिचा गर्भपात झाला आणि गर्भाशय कायमचे निकामी झाले'.



यशवंतराव हे सांगताना ना अत्र्यांवर रागावले ना त्यांच्याबद्दल एकही अपशब्द काढला. मात्र, त्यानंतर अत्रे थेट यशवंतरावांच्या घरी आले. अंत्यत भावनिक होत त्यांनी त्यांची व वेणूताई यांची माफी मागितली, पश्चाताप केला होता. वेणूताई अत्रेंना म्हणाल्या, 'भाऊ त्यानिमित्ताने तरी घरी आला'. तेव्हा अत्रेंना अश्रू अनावर झाले होते आणि यशवंतरावांनी मोठ्या मनाने अत्रेंना माफ केले. ही महाराष्ट्रातील नेत्यांची त्यावेळेची (आजची नव्हे) संस्कृती होती. ती माणसे कुठल्या मातीने बनलेली असावीत?

यशवंतराव चव्हाण साहेबांच्या काळातला महाराष्ट्र हा खराखुरा रागट, तितकाच संस्कार आणि संस्कृतीशील महाराष्ट्र होय. हल्लीच्या महाराष्ट्राबद्दल मात्र न बोललेले बरे...!

# वैभव सूर्यवंशीचा लहान भाऊ आशीर्वादनेही ठोकले शतक

## ८७ चेंडूंमध्ये काढल्या १०३ धावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैभव सूर्यवंशीनंतर आता त्याचा लहान भाऊ आशीर्वाद सूर्यवंशी देखील क्रिकेट जगतात सुवर्णाक्षरांनी स्वतःचे नाव कोरत आहे. १० वर्षांच्या आशीर्वादने समस्तीपूरमध्ये खेळल्या गेलेल्या एका स्थानिक सराव सामन्यात क्रिकेट अकादमी ताजपूरकडून खेळताना ८७ चेंडूंमध्ये १०३ धावा केल्या. त्याच्या या खेळीत २० चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता. उजव्या हाताने फलंदाजी करणाऱ्या आशीर्वादच्या शतकाचा व्हिडिओ आणि धावफलक (स्कोरकार्ड) त्याचा मोठा भाऊ उज्ज्वल सूर्यवंशी याने सोशल मीडियावर शेअर केला आहे. आशीर्वादबद्दल त्याचे वडील संजीव यांनी आधीच सांगितले होते, की त्यांना आशीर्वादलाही येत्या दोन वर्षांत वैभवसारखाच एक उत्कृष्ट क्रिकेटर बनवायचे आहे.



### आयपीएलमध्ये पटकावली 'ऑरेंज कॅप'

वैभव सध्या श्रीलंका 'अ' दौऱ्यावर भारतीय संघासोबत आहे. त्याने आतापर्यंत दोन सामन्यांत ५८ धावा केल्या आहेत. यापूर्वी आयपीएल २०२६ (आयपीएल २०२६) मध्ये त्याने ७७६ धावा करून 'ऑरेंज कॅप' आपल्या नावावर केली होती. वैभवला 'मोस्ट व्हॅल्युएबल प्लेयर', 'इमर्जिंग प्लेयर ऑफ द इयर', 'सुपर स्ट्रायकर' आणि 'सर्वात जास्त षटकार मारणारा खेळाडू' म्हणूनही गौरविण्यात आले होते. त्याने याच हंगामात अवघ्या ३६ चेंडूंमध्ये शतक ठोकून एक नवा विक्रम रचला होता.

**आशीर्वादवरही असेच प्रेम राहू देण्याचे वडिलांचे आवाहन**

आशीर्वादच्या शतकानंतर वडील संजीव सूर्यवंशी यांनीही सोशल मीडियावर आपला आनंद व्यक्त केला. त्यांनी फेसबुक पोस्टमध्ये लिहिले, की 'माझा लहान मुलगा आशीर्वाद सूर्यवंशी याने आज सराव सामन्यात त्याचे पहिले शतक झळकावले. तुम्हा सर्वांना विनंती आहे, की आशीर्वादवरही आपले प्रेम आणि आशीर्वाद असेच राहू द्या.'

**वैभव तीन भावांमध्ये मधला आहे**

वैभव सूर्यवंशी हा तीन भावांमध्ये मधला आहे. त्याच्या मोठ्या भावाचे नाव उज्ज्वल सूर्यवंशी आहे, तर सर्वात लहान भाऊ आशीर्वाद सूर्यवंशी आहे. वडील संजीव सूर्यवंशी आणि आई आरती सूर्यवंशी यांनी दोन्ही मुलांच्या क्रिकेट कारकिर्दीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**वैभवसारखीच फलंदाजी करतो आशीर्वाद**

आशीर्वाद सूर्यवंशी सध्या बिहारमध्ये क्रिकेटचे प्रशिक्षण घेत आहे. तो त्याचा मोठा भाऊ वैभवसारखाच आक्रमक (अटॅकिंग) फलंदाजीसाठी ओळखला जातो. आशीर्वादच्या शतकी खेळीच्या जोरावर क्रिकेट अकादमी ताजपूरने २९.५ षटकांत ४ बाद २३४ धावा केल्या. त्याच्या संघासाठी शिवम राजने ७५ चेंडूंत ५२ धावांचे योगदान दिले. शतक पूर्ण केल्यानंतर आशीर्वादने हेल्मेट काढून जल्लोष केला. त्याचे हे फोटो सध्या सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहेत.

**वैभव भारतीय संघात निवडला गेलेला सर्वांत तरुण खेळाडू**

आशीर्वादचा मोठा भाऊ वैभव सूर्यवंशी सध्या भारतीय क्रिकेटमधील एक गाजलेले नाव आहे. त्याची आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी तसेच एशियन गेम्ससाठी भारतीय संघात निवड झाली आहे. वयाच्या १५ वर्षे ७१ व्या दिवशी टीम इंडियामध्ये स्थान मिळवून तो भारतासाठी निवडला गेलेला सर्वांत तरुण क्रिकेटपटू ठरला आहे. वैभवने याबाबतीत शेफाली वर्मा आणि सचिन तेंडुलकर यांचा विक्रम मागे टाकला. शेफालीची पहिल्यांदा वयाच्या १५ वर्षे २२० व्या दिवशी भारतीय संघात निवड झाली होती, तर सचिनला वयाच्या १६ वर्षे १९४ व्या दिवशी राष्ट्रीय संघात संधी मिळाली होती.

# मेहतर कॉलनीतील घराला आग; लाखोंचे नुकसान

## अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी गॅस सिलिंडर वेळीच बाहेर काढल्याने टळला अनर्थ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील गांधलीपुऱ्यातील मेहतर कॉलनीमध्ये शुक्रवार, दि. १३ जून रोजी दुपारी एका घराला भीषण आग लागून घरातील लाखो रुपयांचे साहित्य खाक झाले. मात्र, जीवाची पर्वा न करता अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी धाडसाने घरात प्रवेश करून गॅस सिलिंडर बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला.

मेहतर कॉलनीतील पप्पू वसंत कलोसे हे कुटुंबीयांसह घराबाहेर गेले असताना दुपारी अडीचच्या सुमारास त्यांच्या घरात आग लागली. आग लागल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी तातडीने पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना माहिती दिली. त्यांनी तत्काळ अग्निशमन दलाचे प्रमुख गणेश गोसावी यांना पाचारण करून अग्निशमन बंब घटनास्थळी रवाना केला. मात्र, मेहतर कॉलनीतील अरुंद गल्ली आणि दुसऱ्या मजल्यावरील घर असल्याने अग्निशमन दलासमोर मोठे आव्हान उभे राहिले. अग्निशमन दलाचे कर्मचारी फारुख शेख, दिनेश बिऱ्हाडे, रफिक पठाण, आकाश बाविस्कर आणि लखन कंखरे यांनी प्रसंगावधान राखत पाण्याचे पाईप लांबपर्यंत वाढविले आणि शेजारच्या घरांवर चढून आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले. दरम्यान, घरामध्ये प्रचंड धूर साचला होता आणि गॅस सिलिंडर आत अडकून पडले होते. उष्णतेची तीव्रता वाढत असताना कोणत्याही क्षणी सिलिंडरचा स्फोट होण्याची शक्यता निर्माण झाली होती. अशा धोकादायक परिस्थितीतही अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी कोणतीही भीती न बाळगता ऑक्सिजन उपकरणांशिवाय घरात प्रवेश केला आणि गॅस सिलिंडर सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यामुळे संभाव्य मोठी दुर्घटना टळली.




*अमळनेर : गांधलीपुऱ्यातील मेहतर कॉलनीमध्ये शुक्रवार, दि. १३ जून रोजी दुपारी एका घराला भीषण आग लागल्याची माहिती मिळाल्यानंतर तत्काळ घटनास्थळी पोहोचून आग विझविण्याच्या कार्यात व्यस्त पालिका अग्निशमन दलाचे कर्मचारी.*

या आगीत घरातील एसी, दूरदर्शन संच, फ्रीज, वॉशिंग मशीन, कपाट, पलंग तसेच अन्य सर्व संसारोपयोगी साहित्य खाक झाले. त्यामुळे कुटुंबाचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दाखविलेल्या धाडसामुळे मोठी जीवितहानी टळली. या शौर्यपूर्ण कामगिरीबद्दल घटनास्थळी उपस्थित नागरिकांनी अग्निशमन दलाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे विशेष कौतुक केले. शहरातही त्यांच्या या धाडसी कार्याची चर्चा सुरू आहे.

# विवाहितेसह मुलगी, वृद्ध बेपत्ता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील रामेश्वरनगरातील वृद्ध तसेच तालुक्यातील लडगाव येथून आपल्या सातवर्षीय मुलीसह विवाहिता बेपत्ता झाल्याच्या तक्रारी अमळनेर पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आल्या आहेत. रामेश्वरनगरातील नाना तुळशीराम पाटील (वय ६०) हे बुधवार, दि. १० जून रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास कुणालाही काहीही न सांगता घरातून निघून गेले. त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांचा शोध घेतला असता ते कुठेही सापडले नाहीत. अखेर त्यांच्या पत्नीने अमळनेर पोलिस ठाण्यात हरविल्याची तक्रार दाखल केली. त्यावरून पोलीस शिपाई नितीन मनोरे तपास करीत आहेत. दुसऱ्या घटनेत लडगाव येथील २६ वर्षीय विवाहिता तिची सातवर्षीय मुलीसोबत अमळनेर येथे दवाखान्यात जाऊन येते, असे सांगून बुधवार, दि. १० जून रोजी सकाळी अकरा वाजता घरून निघाली. रात्रीपर्यंत ती घरी न परतल्याने पतीच्या तक्रारीवरून अमळनेर पोलिस ठाण्याते हरविल्याची तक्रार दाखल करण्यात आली. हवालदार गणेश पाटील तपास करीत आहेत.




*अमळनेर : युगप्रवर्तक बाबा गुरुबचनसिंहजी यांच्या स्मतिदिनानिमित्त रविवार, दि. १४ जून रोजी चोपडा रोडवरील संत निरंकारी सत्संग भवनात आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करताना निरंकारी भक्त. शेजारी जितेंद्र डिंगराई, प्रीती बटेजा यांच्यासह अमळनेर सेवादल सदस्य व साधक.*

# अमळनेरमध्ये ५३ निरंकारी भक्तांकडून रक्तदान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : युगप्रवर्तक बाबा गुरुबचनसिंहजी यांच्या स्मतिदिनानिमित्त आयोजित रक्तदान शिबिरापूर्वी शनिवार, दि. १३ जून रोजी संपूर्ण अमळनेर शहरात मोटारसायकल रॅलीच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. त्यानंतर रविवार, दि. १४ जून रोजी सकाळी ९ ते दुपारी ३ दरम्यान येथील चोपडा रोडवरील संत निरंकारी सत्संग भवनात आयोजित रक्तदान शिबिरात ५३ रक्त युनिट संकलन करण्यात आले.

धुळे झोन ३६ बीचे झोनल इन्चार्ज हिरालाल पाटील यांनी फित कापून रक्तदान शिबिराचे उद्घाटन केले. यावेळी अमळनेर ब्रँचचे प्रमुख श्रीचंद निरंकारी उपस्थित होते. शिबिरासाठी आलेल्या रक्तदात्यांना अल्पोपहार, चहा, बिस्कीट, फलाहार देऊन प्रशस्तिपत्र वाटप करण्यात आले.

वर्षभर चालणाऱ्या सेवा उपक्रमांचा हा प्रारंभबिंदू आहे. या अंतर्गत देशभरात सुमारे ७०५ ठिकाणी रक्तदान शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. करुणा आणि एकात्मतेची भावना अधिक दृढ करण्याचा संकल्प यामागे आहे. विशेष म्हणजे रक्तदानाची ही पावन परंपरा मागील चार दशकांपासून अखंडपणे सुरू आहे. आतापर्यंत ९,१७४ रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून सुमारे १५ लाख २३० युनिट रक्त संकलित करण्यात आले असून, मानवसेवेप्रती निरंकारी मिशनची अटळ बांधिलकी यामुळे अधोरेखित होते.

शिबिराप्रसंगी रक्तकेंद्र विभाग शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय धुळे येथील अनुभवी डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदात्यांची आवश्यक आरोग्य तपासणी करून सुरक्षित, सुव्यवस्थित आणि प्रभावी पद्धतीने रक्तदान प्रक्रिया पूर्ण केली. संपूर्ण आयोजनात स्वच्छता, सतर्कता आणि सेवाभाव यांना विशेष प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे हा उपक्रम केवळ जीवनदायी सेवापुरता मर्यादित न राहता मानवता, करुणा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे उच्च प्रतीक म्हणून समोर आला.

शिबिर आयोजन-नियोजनासाठी अमळनेर ब्रँच सेवादलाचे इन्चार्ज जितेंद्र डिंगराई, महिला इन्चार्ज प्रीती बटेजा यांच्यासह अमळनेर सेवादल सदस्य व साधकांनी शिबिर यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

# जळगावकरांची हवाई प्रवासाला पसंती...

## प्रवासी वाहतुकीने वर्षभरात गाठला १.४० लाखांचा टप्पा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यात सर्वाधिक वेगाने विकसित होण्याचा मान मिळालेल्या जळगाव शहरातील विमानतळावरून गेल्या आर्थिक वर्षात एक लाख ४० हजारांहून अधिक प्रवाशांनी प्रवास केला असून, वाढते महत्त्व लक्षात घेता विमानतळ विस्तारासाठी लवकरच २५ कोटी रुपयांची योजना राबविण्यात येणार आहे. ही माहिती भारतीय विमानतळ प्राधिकरणातर्फे सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी साजऱ्या होत असलेल्या प्रवासी सुविधा दिनाच्या पार्श्वभूमीवर देण्यात आली.

संचालक हर्ष कुमार त्रिपाठी यांच्या म्हणण्यानुसार १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत जळगाव विमानतळावर ७२ हजार ६ प्रवाशांचे आगमन आणि ७१ हजार ९८६ प्रवाशांचे प्रस्थान, अशा एकूण एक लाख ४३ हजार ९९२ प्रवाशांना सेवा देण्यात आली. विमानतळावर २९ कायमस्वरूपी आणि ३५ कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. सध्या फ्लाय ९१ आणि अलायन्स एअर, या विमान कंपन्यांच्या नियोजित उड्डाणांचे संचालन केले जाते. तसेच दोन खासगी प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून वैमानिक प्रशिक्षण केंद्रही चालविले जाते.

ज्याद्वारे सद्यःस्थितीत सुमारे १०० प्रशिक्षणार्थी वैमानिक प्रशिक्षण घेत आहेत. नियमित विमानसेवांमुळे जळगावचा पुणे, मुंबई, गोवा, हैदराबाद आणि अहमदाबाद या प्रमुख शहरांशी हवाई संपर्क प्रस्थापित झाला असून, यामुळे उद्योग तसेच व्यापार आणि पर्यटन क्षेत्राला चालना मिळत आहे. दिल्लीशी थेट हवाई संपर्क प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे विमानतळ प्रशासनाने सांगितले.




**धावपट्टी ३ किलोमीटरपर्यंत वाढणार**

प्रवासी सुविधांच्या दृष्टीने विमानतळावर उपहार गृह, वैद्यकीय सहाय्य केंद्र, मोफत वाय-फाय आणि सुसज्ज टर्मिनलसह विविध सुविधा उपलब्ध आहेत. सध्या टर्मिनलची क्षमता १२० प्रवाशांची असून, ती वाढवून ३०० प्रवाशांपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव आहे. यासाठी सुमारे २५ कोटी रुपयांची टर्मिनल आणि एप्रन विस्तार योजना मंजूर देखील झाली आहे. ज्यासाठी निविदा प्रक्रियाही सुरू करण्यात आली आहे. विमानतळाची धावपट्टी सध्या १.७ किलोमीटर लांबीची असून, विमानतळाच्या मास्टर प्लॅननुसार धावपट्टी ३ किलोमीटरपर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव आहे. सुरक्षेच्या दृष्टीने विमानतळाला नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाकडून (डीजीसीए) २०२८ पर्यंत परवानाधारक विमानतळ म्हणून मान्यता देण्यात आली आहे. विमानतळावर प्रशिक्षित अग्निशमन व बचाव पथक, अत्याधुनिक अग्निशमन वाहने आणि रुग्णवाहिका सुविधा उपलब्ध आहेत.

**२२८ किलोवॉटचा सौर ऊर्जा प्रकल्प**

याशिवाय हवाई वाहतूक नियंत्रण आणि वैमानिकांमधील संवाद अधिक सक्षम करण्यासाठी ३० लाख रुपये खर्चून नवीन अति उच्च वारंवारता संप्रेषण प्रणाली बसविण्यात आली आहे. पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत विमानतळ परिसरात २२८ किलोवॉट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला असून, विमानतळाच्या वीज गरजा पूर्ण करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाची भूमिका बजावत आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर येत्या काळात जळगाव विमानतळाचे महत्त्व वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. याशिवाय लगतच्या अजिंठा, अमळनेर आणि शेगावसारख्या पर्यटन व धार्मिक स्थळांसाठीही हे विमानतळ महत्त्वाचा दुवा ठरत असल्याचे भारतीय विमानतळ प्राधिकरणाने नमूद केले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिंगबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिंगबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# पिता की हत्या के बाद चढ़ा अफसर बनने का जुनून

सक्सेस स्टोरी

## फीस के लिए बेचा अनाज, हिंदी में पढ़कर बने आयपीएस



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कठिन परिस्थितियां अक्सर बड़े सपनों को पूरा करने और आगे बढ़ने का जुनून पैदा करती हैं। कुछ ऐसी ही कहानी है बस्ती के रहने वाले बजरंग प्रसाद यादव की। उन्होंने जीवन की सबसे बड़ी त्रासदी के बाद हार मानने के बजाय अपने लक्ष्य को अपनी ताकत बना लिया। पिता की हत्या के बाद परिवार पर दुखों का पहाड़ टूटा, आर्थिक तंगी इतनी थी कि पढ़ाई के लिए अनाज बेचना पड़ा लेकिन उन्होंने हिम्मत नहीं हारी। हिंदी मीडियम से पढ़ाई करते हुए यूपीएससी परीक्षा क्रैक की और आयपीएस अफसर बने। उनकी सक्सेस स्टोरी उन युवाओं को आगे बढ़ने का हौसला देती है, जो कठिन परिस्थितियों में हार मान लेते हैं।

### बस्ती के रहने वाले हैं बजरंग प्रसाद, गांव से हुई शुरुआती पढ़ाई

बजरंग प्रसाद उत्तर प्रदेश के बस्ती के रहने वाले हैं। वह एक इंटरव्यू में बताते हैं कि उनकी शुरुआती पढ़ाई गांव के स्कूल से ही हुई है। प्राइवेट स्कूल से उन्होंने १० वीं-१२ वीं कंप्लीट किया था। इसके बाद वह इलाहाबाद यूनिवर्सिटी पहुंचे और मैथ्य से बीएस्सी पूरा किया। गांव में एक साधारण परिवार से होने के बाद भी उनके सपने बड़े थे और वह हमेशा से कुछ अलग करना चाहते थे।

### २०२० में किसान पिता की हत्या, अफसर बनने के लिए यूपीएससी का सफर

वह बताते हैं कि उनके पिता किसान थे। उनके पिता खेती के साथ-साथ गांव के जरूरतमंद और कमजोर लोगों की मदद के लिए हमेशा तैयार रहते थे। साल २०२० में उनकी हत्या कर दी गई और कारण उनका कर्तव्य और निडरता था।

इस दर्दनाक घटना ने उनके पूरे परिवार को दुख से भर दिया। पिता के जाने के बाद बजरंग ने ठान लिया किया वे अन्याय के खिलाफ आवाज बनेंगे और अगर वह कुछ बन जाएंगे तो किसी परिवार के साथ ऐसी घटना न हो। यहीं से यूपीएससी को उन्होंने अपना जुनून बना लिया और आगे बढ़े।

### फीस के लिए बेची फसल, मां के साथ ने संभाला

जब बजरंग अपने लक्ष्य की ओर बढ़ रहे थे तो आर्थिक तंगी के बीच कोचिंग की फीस भरना मुश्किल था। फसल बेचकर उन्होंने दिल्ली में अपनी फीस जमा की और अपने आप को मजबूत रखा। अपनी पूरी ताकत से आगे बढ़ते हुए वह बार-बार यूपीएससी को ही समझते थे और उन्होंने अपनी परीक्षा की तैयारी शुरू की। इस दौरान उनकी मां ने उन्हें संभाला, फोन पर समझाती थीं और जितना संभव था, उतना साथ दिया।

### हिंदी मीडियम से यूपीएससी की तैयारी, २ बार सफलता पर नहीं रुके कदम

बजरंग ने हिंदी मीडियम से यूपीएससी की तैयारी की थी लेकिन उनका जुनून ऐसा था कि २ बार यूपीएससी परीक्षा में असफल होने पर भी नहीं रुके। हर बार खुद को बेहतर करके आगे बढ़ने का फैसला किया। एक बार तो वह यूपीएससी मेन्स परीक्षा में सिर्फ २७ नंबर से असफल हो गए थे। रिजल्ट के बाद दुख तो हुआ लेकिन फिर से मजबूत होकर वह लगे रहे।

### तीसरे प्रयास में मिली सफलता, आज हैं आयपीएस अधिकारी

५ जून २०२२ में उन्होंने अपना तीसरा अटेंप्ट दिया था। इस बार उन्होंने यूपीएससी की परीक्षा क्रैक कर ली। इस बार ४५४ वीं रैंक लाकर वह आयपीएस अफसर बने। पिता की हत्या के बाद भी बजरंग ने उस सपने को पूरा किया, जिसका निश्चय उन्होंने विपरीत परिस्थितियों में किया था।

बजरंग कहते हैं कि पिता के साथ हुई घटना ने उन्हें यह समझने पर मजबूर कर दिया था कि कमजोर और असहाय लोगों की मदद प्रशासनिक पद पर रहकर की जा सकती है। इसी सोच ने उन्हें आगे बढ़ने की प्रेरणा दी और आज उनकी कहानी युवाओं को आगे बढ़ने का हौसला देती है।

# खात्यात अवघे ८४ रुपये, रोज बँकेसमोर जाऊन पाया पडायचा

## ‘धुरंधर’ आधी अशी होती ‘आलम’ची परिस्थिती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



‘धुरंधर’मधील आलम हे कॅरेक्टर खूप लोकप्रिय झाले. या अभिनेत्याने पहिल्यांदाच त्याच्या स्ट्रगलबद्दल सांगितले. कॉमेडी आणि अभिनयाच्या जगात स्वत:चे स्थान निर्माण केलेला गौरव गेरा सध्या ‘धुरंधर’ आणि ‘धुरंधर : द रिव्हेंज’च्या यशाचा आनंद घेतोय. त्याच्या कामाची सोशल मीडियावर आणि प्रेक्षकांमध्ये मोठ्या प्रमाणावर चर्चा होत आहे. मात्र आज तो ज्या स्थानावर आहे तिथपर्यंत पोहोचण्याचा त्याचा प्रवास अजिबात सोपा नव्हता. एक काळ असा होता जेव्हा त्याच्या बँक खात्यात फक्त ८४ रुपये शिल्लक होते. परिस्थिती इतकी आव्हानात्मक होती, की तो दररोज बँकेसमोरून जाताना माझे दिवस बदलू देत अशी आशा करायचा. पण तो आपल्या स्वप्नांचा त्याग करायला कधीच तयार नव्हता.

‘धुरंधर’मधील ‘मोहम्मद आलम’च्या भूमिकेमुळे चर्चेत आलेला गौरव गेराची चित्रपटसृष्टीची कोणतीही पार्श्वभूमी नव्हती, आर्थिक सुरक्षितता नव्हती आणि यशाची कोणतीही हमी नव्हती. तरीही, त्याने आपल्या स्वप्नांवरचा विश्वास कायम ठेवला. त्याचा संघर्ष, स्वाभिमान, कुटुंब आणि कधीही हार न मानण्याची वृत्ती यांची कहाणी केवळ एका अभिनेत्याची नाही तर अशा प्रत्येक व्यक्तीची आहे, जी कठीण परिस्थितीतही आशा सोडत नाही.

एका मुलाखतीत गौरवने आपल्या सरूवातीच्या संघर्षांबद्दल, कारकिर्दीतील चढ-उतारांबद्दल, आर्थिक अडचणींबद्दल आणि त्याला जमिनीवर पाय घट्ट ठेवायला शिकवणाऱ्या धड्यांबद्दल मनमोकळेपणाने सांगितले. तो म्हणाला, की ‘माझ्या कुटुंबात चित्रपटसृष्टीत कोणीही नव्हते. वार्षिक कार्यक्रम आणि फॅन्सी ड्रेस स्पर्धांमधून शालेय जीवनातच त्याची कला सादर करण्यामधील आवड निर्माण झाली. शाळेत अभ्यासाला अधिक महत्त्व दिले जात होते.’
तो म्हणाला, की ‘मला कला आणि हस्तकलेत ए-प्लस गुण मिळायचे, पण अभ्यासात मी ७२ टक्के , ८० टक्के आणि ८२ टक्के गुण मिळविणारा विद्यार्थी होतो. ज्या गोष्टींमध्ये मी चांगला होतो त्यांना प्रोत्साहन मिळत नाही, असे मला वाटायचे.’

आपल्या कलात्मक कौशल्यांना करिअरमध्ये बदलण्याच्या उद्देशाने, गौरवने सुरूवातीला फॅशन डिझायनिंगची निवड केली. तो म्हणाला, की ‘मी स्केचिंगमध्ये चांगला होतो. मी कॉलेज ऑफ आर्ट्समध्ये अर्ज केला पण ते जमले नाही. मग मी फॅशन क्षेत्रात गेलो आणि पर्ल अकॅडमी ऑफ फॅशनमध्ये प्रवेश घेतला. पण तो कोर्स आवडला नाही.’
‘मला वाटले की मला हे करायचे नाही. मी माझ्या वडिलांना म्हणालो, की ‘पैसे वाचवा, हा खूप महागडा कोर्स आहे. मी करणार नाही.’ माझे वडील म्हणाले, ‘तो पूर्ण कर. सहा महिने काम कर, मग तुला जे हवे ते कर.’ अगदी बरोबर, मी सहा महिने काम केले आणि मग थिएटरमध्ये सामील झालो.’
तो पुढे म्हणाला, की ‘माझे वडील आयआयटी-बीएचयूचे इंजिनिअर आहेत. माझा भाऊ सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. पण माझ्यावर काहीही लादले गेले नाही. त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे.’

मुंबईत आल्यानंतर आलेल्या आर्थिक अडचणी आठवून गौरवने एक कधीच विसरता न येणारा किस्सा सांगितला. तो म्हणाला, की माझ्या खात्यात ८४ रुपये होते. मी एचडीएफसी बँकेसमोरून जाताना बँकेकडे पाहून म्हणायचो, ‘माझी काळजी घ्या.’ तो हसला आणि पुढे म्हणाला, की ‘मी प्रत्येक वेळी बँकेत येताना-जाताना वाकून नमस्कार करायचो. माझ्या वडिलांनी मला शक्य तितकी मदत केली, पण पैसे मर्यादित होते.’

गौरव म्हणाला, की ‘माझे वडील पगारदार होते. माझ्याकडे अजूनही त्यांची पत्रं आहेत ज्यात ते लिहायचे, ‘मी २००० रुपये पाठवत आहे यापेक्षा जास्त नाही. माझ्याकडे ऑटोसाठी पैसे नसायचे तेव्हा मी चालत जायचो. मी थोडा स्वाभिमानी होतो. मला देणारा व्हायचे होते घेणारा नाही.’
गौरवने मुंबईत आल्यानंतर लगेचच घरी लिहिलेल्या एका पत्राचा उल्लेख केला. त्या पत्रात लिहिले होते, की ‘आर्थिक आघाडीवर अजून काहीही झालेले नाही, पण कृपया माझ्यावर विश्वास ठेवा. कुटुंबाने त्याच्यावर विश्वास ठेवत राहावा, कारण भविष्य उज्ज्वल आहे आणि त्याला अजून खूप काही शिकायचे आहे.’ आज मागे वळून पाहताना, त्याला त्या पत्रातील परिपक्वतेचा अभिमान वाटतो. ‘मला त्या पत्राचा सूर खूप आवडतो. त्यात कोणताही अहंकार नव्हता किंवा आपल्याला सर्व काही माहित असल्याचा कोणताही भावही नव्हता. आज जर मला असे मूल असते, तर मी त्याला नक्कीच पाठिंबा दिला असता.’

# अनेक लोक फ्रीजमध्ये १ रुपयाचे नाणे का ठेवतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**





सोशल मीडियावर अलीकडे एक अजब सवय चर्चेत आहे प्रवासी लोक प्रवासाला जाण्याआधी फ्रिजमध्ये १ रुपयांचे नाणं ठेवतात. हे वाचून अनेकांना आश्चर्य वाटते. ‘फ्रीजमध्ये नाणे का ठेवायचे?’ यामागे कोणताही जादू-टोणा नाही, तर एक साधा पण एक घरगुती ट्रिक आहे. लोक प्रवासाला जाताना काही दिवस घर बंद ठेवतात. अशावेळी वीज गेली, फ्रीज बंद पडला किंवा डीफ्रॉस्ट झाला तर आत ठेवलेले अन्न खराब होऊ शकते. हे लक्षात यायला उशीर होतो कारण घरात कोणी नसते. येथेच १ रुपयाचे नाणे ‘इंडिकेटर’ म्हणून वापरले जाते. ही पद्धत खरेतर एका साध्या विज्ञानावर आधारित आहे गोठलेल्या पाण्याची अवस्था. लोक एक कप किंवा छोटा डबा घेऊन त्यात पाणी भरतात आणि तो फ्रीजरमध्ये ठेवतात. पाणी पूर्णपणे गोठल्यावर त्यावर नाणे ठेवतात.

जर घरात वीज खंडित झाली आणि फ्रीज बंद पडला, तर आतील बर्फ आधी वितळते. नंतर वीज परत आली की ते पुन्हा गोठू शकते. अशा वेळी नाणे आपल्या जागेवर राहत नाही ते खाली सरकते किंवा बुडते. यावरून समजते. की फ्रीजर किती वेळ बंद होता आणि अन्न किती प्रमाणात खराब झाले असण्याची शक्यता आहे. ही ट्रिक विशेषतः त्या लोकांसाठी उपयुक्त आहे जे लांब प्रवासाला जातात किंवा वारंवार वीज खंडित होणाऱ्या भागात राहतात. यामुळे घरात ठेवलेल्या मांस, दूध, आईस्क्रीम किंवा इतर नाशवंत पदार्थांची सुरक्षितता तपासता येते. ही पद्धत पूर्णपणे वैज्ञानिक अचूकता देणारी नाही. ती फक्त एक साधा ‘visual indicator’ आहे. त्यामुळे परत आल्यानंतर फक्त नाणे पाहून निर्णय न घेता अन्नाचा वास, रंग आणि स्थितीही तपासणे गरजेचे असते. आजच्या काळात सोशल मीडियामुळे अशा छोट्या-छोट्या घरगुती ट्रिक्स व्हायरल होत आहेत.

**ही ट्रिक कशी काम करते?**

एक कप किंवा छोटा डबा घेऊन त्यात पाणी भरतात. तो फ्रीजर मध्ये ठेवतात. पाणी पूर्ण गोठल्यावर त्यावर १ रुपयाचे नाणे ठेवतात. निघण्यापूर्वी फ्रीज तसाच ठेवून घर बंद करतात.

**परत आल्यानंतर काय तपासतात?**

जेव्हा लोक परत येतात तेव्हा ते नाण्याची स्थिती पाहतात. जर नाणे अजून वरच असेल तर समजून जा की वीज व्यवस्थित होती, फ्रीजर सतत चालू होता.
जर नाणे खाली बुडलेले असेल तर वीज गेली असण्याची शक्यता जास्त आणि अन्न वितळून पुन्हा गोठले असू शकते.
जर नाण्याची जागा बदललेली असेल तर तापमानात मोठा बदल झाला असू शकतो.

**ही ट्रिक किती उपयुक्त आहे?**

ही पद्धत एक ‘simple power outage indicator’ आहे. विशेषतः लांब प्रवासासाठी उपयुक्त. वीज खंडित झाल्याचा अंदाज देण्यासाठी मदत. अन्न सुरक्षित आहे की नाही याचा अंदाज मिळतो.

**ही गोष्टी लक्षात ठेवा**

ही ट्रिक वैज्ञानिकदृष्ट्या अचूक मोजमाप नाही. ती फक्त एक साधा ‘visual clue’ आहे. त्यामुळे जर नाणे खाली गेले असेल, तर अन्न लगेच न फेकता वास, रंग आणि स्थिती तपासणे आवश्यक आहे. आजच्या डिजिटल युगात अशा साध्या घरगुती ट्रिक्स व्हायरल होणं हे दर्शवतं की लोक अजूनही प्रॅक्टिकल लाइफ हॅक्स शोधत असतात. १ रुपयाचे नाणे ही त्यापैकीच एक छोटी पण उपयोगी कल्पना आहे, जी कोणत्याही खर्चाशिवाय अन्न सुरक्षिततेबाबत एक अतिरिक्त ‘सेफ्टी चेक’ देते.

**अतिरिक्त पॉइंट**

ही ट्रिक वापरताना लक्षात ठेवा की नाण्याची स्थिती हा फक्त प्राथमिक अंदाज आहे.अन्नाची सुरक्षितता ठरवण्यासाठी नेहमी वास, टेक्स्चर आणि रंग यांचीही तपासणी करणे आवश्यक आहे.












# अधिक मासात सोमवती अमावास्येचा यंदा ३० वर्षांनंतर योग!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

वैदिक ज्योतिष शास्त्रानुसार सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी येणारी सोमवती अमावास्या ही अत्यंत विशेष मानली जाणारी आहे. याचे कारण म्हणजे तब्बल ३० वर्षांनंतर अधिक मासात असा दुर्मिळ संयोग जुळून आला आहे. त्यामुळे याचा लाभ अधिक पटींनी मिळणार आहे.

**सोमवती अमावास्या तिथी शुभ मुहूर्त**

हिंदू पंचांगानुसार अमावास्या तिथीची सुरूवात रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजून २० मिनिटांनी सुरू होणार आहे. तर या तिथीची समाप्ती सोमवार, दि. १५ जून रोजी सकाळी ८ वाजून २४ मिनिटांनी होणार आहे. मात्र, उदय तिथीनुसार सोमवारीच ही अमावास्या असल्याकारणाने पवित्र व्रत, दान आणि स्नान १५ जून २०२६ रोजी करावे.

## आजच्या दिवशी नक्की करा 'या' ५ गोष्टी; घरात देवी लक्ष्मी येणार

**या दिवशी ५ गोष्टी नक्की करा पवित्र स्नान आणि सूर्याला अर्घ्य :** सोमवती अमावास्येच्या दिवशी सकाळी सूर्योदयापूर्वी उठून पवित्र नदीत किंवा घरीच पाण्यात थोडं गंगाजल टाकून स्नान करावे आणि सूर्यदेवाला अर्घ्य द्यावे. त्यामुळे आरोग्यात सुधारणा होते.

**शिवलिंगावर विशेष अभिषेक**



**करावा :** सोमवारचा दिवस आणि सोमवती अमावास्या एकत्र आल्याने भगवान शंकर यांची पूजा करणे अत्यंत फलदायी मानले जाते. या दिवशी भगवानन शंकर यांच्या पिंडीवर कच्चे दूध, जल आणि बेलपत्र अर्पण करून 'ॐ नमः शिवाय' या मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**पिंपळाच्या झाडाची परिक्रमा**

सोमवती अमावास्येला पिंपळाच्या झाडामध्ये त्रिदेवांचा (ब्रह्मा, विष्णू, महेश) यांचा वास मानला जातो. या दिवशी पिंपळाच्या झाडाला



दूध-पाणी अर्पण करुन १०८ वेळा परिक्रमा केल्यास जीवनातील आर्थिक अडचणी दूर होतात.

**पितृदोष निवारण आणि तर्पण**

जर कुंडलीत पितृदोष असेल किंवा कामात सतत अडथळे येत असतील, तर या दिवशी पितरांचे स्मरण करून तर्पण आणि पिंडदानाचा विधी करावा. यामुळे पूर्वजांचा आशीर्वाद मिळतो.

**महादान आणि पुण्य**

गरजू लोकांना अन्न, वस्त्र, काळे तीळ किंवा छत्री दान केल्याने राहू-केतू आणि शनी ग्रहांचे दोष शांत होतात.

# आज सोमवती अमावास्या!

## चुकूनही घरात आणू नका 'ही' वस्तू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोमवती अमावास्येच्या दिवशी बाजारातून काही वस्तू खरेदी करून घरात आणणे अत्यंत वर्ज्य मानले जाते. या दिवशी नकळत केलेली एक छोटीशी चूक संपूर्ण कुटुंबाला आर्थिक संकटात टाकू शकते.

हिंदू धर्मात अमावास्या आणि पौर्णिमा तिथीला विशेष महत्त्व आहे. खास करून अमावास्या फार महत्त्वाची मानली जाते. अमावास्या तिथीला पितरांच्या स्मरणासाठी आणि आध्यात्मिक साधनेसाठी अत्यंत पवित्र मानले जाते.

ज्येष्ठ अधिक मासाची अमावास्या सोमवारच्या दिवशी अमावास्या आल्यामुळे हा 'सोमवती अमावास्येचा' महासंयोग बनला आहे. ज्योतिषशास्त्रानुसार या दिवशी पवित्र नदीत स्नान आणि दानधर्म केल्याने पितृदोष दूर होतो. पण धार्मिक नियमांनुसार सोमवती अमावास्येच्या दिवशी बाजारातून काही वस्तू खरेदी करून घरात आणणे अत्यंत वर्ज्य मानले जाते. या दिवशी नकळत केलेली एक छोटीशी चूक घरातील सकारात्मक ऊर्जा नष्ट करू शकते आणि संपूर्ण कुटुंबाला आर्थिक संकटात टाकू शकते.

**धान्य आणि पीठ खरेदी करणे टाळा :** सोमवती अमावास्येच्या दिवशी घरासाठी लागणारे नवीन धान्य किंवा पीठ विकत आणू नये. शास्त्रानुसार, अमावास्या हा पितरांचा दिवस असतो आणि या दिवशी नवीन अन्नाची खरेदी केल्याने घरात दारिद्र्य वाढते. आवश्यक असल्यास धान्याची खरेदी एक दिवस आधीच करून ठेवावी.

**स्वयंपाकाचे किंवा मोहरीचे तेल घरात आणू नका :** अमावास्येला तेल खरेदी करणे अत्यंत अशुभ मानले जाते. तेलाचा संबंध थेट शनी देवाशी असतो. अमावास्येच्या दिवशी तेल विकत घेतल्याने कुंडलीत शनीचा दोष निर्माण होतो. ज्यामुळे व्यवसायात मोठे नुकसान होऊ शकते आणि पैशांची चणचण भासू लागते.

**लोखंडाच्या वस्तू खरेदी करू नका :** सोमवती अमावास्येला कोणत्याही प्रकारच्या लोखंडी वस्तू, भांडी किंवा तीक्ष्ण हत्यारे घरी आणू नयेत. वास्तूनुसार, अमावास्येला लोखंड घरी आणल्याने राहू-केतू आणि शनीचा अशुभ प्रभाव वाढतो, ज्यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये विनाकारण वादविवाद आणि कलह निर्माण होतात.

**झाडू खरेदी करणे महाअशुभ :** झाडूला माता लक्ष्मींचे रूप मानले जाते. परंतु, वास्तुशास्त्रानुसार अमावास्येच्या दिवशी नवीन झाडू खरेदी करून घरात आणणे पूर्णपणे निषिद्ध आहे. असे केल्याने माता लक्ष्मी रुष्ट होतात आणि घरातील चालून आलेली संपत्ती किंवा पैशांची आवक अचानक थांबते.

# अधिक मास सोमवती अमावास्येचे महत्त्व, पूजाविधी आणि कथा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात अमावास्या तिथीला मोठे महत्त्व आहे. अनेक लोकांच्या मते अमावास्या ही अशुभ तिथी असते. मात्र असे नाही. अमावास्या देखील शुभ तिथी समजली जाते. हिंदू पंचांगानुसार चांद्रमासातील तिसावी आणि शेवटची तिथी म्हणजे अमावास्या होय. या दिवशी रात्री चंद्र पृथ्वीवरून पूर्णपणे दिसत नाही वर्षभरात एकूण १२ अमावास्या येतात, ज्यांचे हिंदू धर्मात विशेष धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे.
आता लवकरच अधिक मासातील शेवटची तिथी अमावास्या येणार आहे. मुख्य म्हणजे ही अमावास्या सोमवती अमावास्या आहे. हिंदू धर्मात सोमवती अमावास्येला महत्त्वाचे आणि अत्यंत पुण्यवान मानले जाते. ही अमावास्या सोमवारी येत असल्यामुळे तिला सोमवती अमावास्या म्हणून ओळखले जाते. यावर्षी सोमवती अमावास्या अधिक मासात येत असल्यामुळे तिचे महत्त्व आणखी वाढले आहे.

सोमवती अमावास्येला एक विशेष स्थान आहे. कारण या दिवशी स्नान, दान, उपवास आणि पूजा करणाऱ्या व्यक्तीला भगवान शिव आणि पार्वती मातांचा आशीर्वाद, शाश्वत सौभाग्याचे वरदान आणि इतर अनेक फायदे मिळतात. सोमवती अमावास्या हा पितरांचे तर्पण, पूजन करण्यासाठी अत्यंत शुभ दिवस मानला जातो. यंदाची अमावास्या अधिक मासात येत असल्यामुळे या दिवशी पवित्र नद्यांमध्ये स्नान केल्याने आणि दानधर्म केल्याने लाभ मिळतो. यंदा अमावास्या तिथी रविवार, १४ जून रोजी दुपारी १२.२० वाजता सुरू होईल आणि सोमवार, १५ जून २०२६ रोजी सकाळी ८.२४ पर्यंत चालेल. उदय तिथीनुसार १५ जून २०२६ रोजी सोमवती अमावास्येचा



उपवास केला जाईल.

सोमवती अमावास्येच्या दिवशी शूल योग आणि मृगशीर्ष नक्षत्र देखील असणार आहे. या दिवशी शूल योग पहाटेपासून सकाळी ८ वाजून ५५ मिनिटांपर्यंत असतो. त्यानंतर १६ जून २०२६ रोजी पहाटे ४ वाजून ३८ मिनिटांपर्यंत गंडा योग असतो. मृगशीर्ष नक्षत्र देखील पहाटेपासून सायंकाळी ७ वाजून ९ मिनिटांपर्यंत असेल. सोमवती अमावास्या ही हिंदू धर्मात विशेष धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व असलेली तिथी आहे, जी अमावास्या सोमवारी येत असल्याने 'सोमवती' म्हणून ओळखली जाते. ही तिथी वर्षातून एक किंवा दोनदा येते आणि याला पितृ कार्य, स्नान-दान आणि भगवान शिव-पार्वतीच्या पूजेचे विशेष महत्त्व आहे.

शनी आणि कालसर्प दोषापासून मुक्ती मिळविण्यासाठी सोमवती अमावास्येचा दिवस विशेष आहे. शनिदेवाच्या साडेसातीचे दुष्परिणाम टाळण्यासाठी सोमवती अमावास्येच्या दिवशी शनिदेवाला मोहरीचे तेल अर्पण करावे. सोमवती अमावास्येच्या दिवशी विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी उपवास करतात. तसेच या दिवशी मौन पाळण्याची परंपरा आहे. सोमवती अमावास्येच्या दिवशी गंगेत स्नान केल्याने पापांचा नाश होतो आणि पुण्य प्राप्त होते, असा विश्वास आहे. या दिवशी स्नान केल्याने मोक्ष मिळतो, असे मानले जाते. या वर्षी सोमवती अमावास्या ज्येष्ठ महिन्यात येत आहे म्हणून स्नान करून जलदान करा. भगवान विष्णूंच्या कृपेने तुम्हाला मोक्षप्राप्ती होईल आणि तुमची सर्व पापे नाहीशी होतील. तुम्ही वस्त्र, अन्न, फळे, छत्र्या, पंखे इत्यादी वस्तूंचेही दान करू शकता.

**सोमवती अमावास्या कथा**

एका सावकाराला सात मुले आणि एकच मुलगी होती. एक ब्राह्मण अनेकदा त्यांच्या घरी भिक्षा मागण्यासाठी येत असे. जेव्हा जेव्हा सावकाराची मुलगी भिक्षा घेऊन यायची तेव्हा तो ब्राह्मण भिक्षा घेण्यास नकार देत असे आणि तीला म्हणायचा की तुझ्या नशिबात चांगले भाग्य लिहिलेले नाही. हे ऐकून सावकाराची मुलगी दुःखी व्हायची. असे अनेकवेळा घडले, मग एके दिवशी सावकाराच्या मुलीने तिच्या आईला सगळा प्रकार सांगितला, एक ब्राह्मण कसा भिक्षा मागायला येतो आणि तिच्याकडून भिक्षा घेण्यास नकार देतो.

सावकाराच्या पत्नीने तिच्या मुलीला सांगितले, की पुढच्या वेळी भिकारी येईल तेव्हा मला सांग. एके दिवशी भिकारी दारात आला तेव्हा सावकाराची बायको दाराच्या मागे लपून सर्व काही ऐकत होती. नेहमीप्रमाणेच घडले. भिकाऱ्याने भिक्षा घेण्यास नकार दिला आणि सांगितले, की तुझ्या नशिबात विधवा होण्याचे लिहिले आहे, सौभाग्य प्राप्ती नाही. हे ऐकून सावकाराची पत्नी दारातून बाहेर आली आणि भिकाऱ्याला म्हणू लागली की आम्ही भिक्षा देतो, वरून तू आम्हाला एक अशुभ गोष्ट सांगत आहेस. ब्राह्मण म्हणाला की मी जे बोलतो ते खरे आहे, तुझ्या मुलीच्या नशिबात सौभाग्य प्राप्ती लिहिलेले नाही. जेव्हा तुमची मुलगी लग्नाच्या वेळी सप्तपदी घेत असेल, त्याच वेळी एक साप येईल आणि तिच्या पतीला चावेल आणि ती विधवा होईल.

ब्राह्मणाचे बोलणे ऐकून सावकाराची बायको दुःखी झाली, पण नंतर ती ब्राह्मणाला म्हणाली, की ती विधवा होणार हे तुला माहीत असेल तर तिच्या सौभाग्याचे रक्षण कसे होईल हेही सांगा. सावकाराच्या बायकोने हे विचारल्यावर ब्राह्मण म्हणाला की इथून खूप दूर एक गाव आहे तिथे सोना धोबी राहते. ती प्रत्येक सोमवती अमावास्येला उपवास करते. त्यामुळे तिचं सौभाग्य दृढ आहे. तिने येऊन तिचं सौभाग्य तुमच्या मुलीला दिले तर ती विधवा नाही होणार. ब्राह्मणाचे म्हणणे ऐकून सावकाराच्या पत्नीने ब्राह्मणाचे आभार मानले आणि ती सोना धोबिणीच्या शोधात निघाली. एके दिवशी भरपूर उन्हामुळे ती पिंपळाच्या सावलीत विश्रांती घेत होती. तेव्हा त्याने पाहिले की एक साप आला आणि गरुडाच्या पिलांना खाण्यासाठी त्या पिंपळाच्या झाडावर चढू लागला. सावकाराच्या पत्नीने सापाला मारून गरुडाच्या मुलांचे रक्षण केले. इतक्यात गरुडही तेथे आला आणि त्याने पाहिले की, सर्वत्र रक्त पसरले आहे. गरुडला वाटले की सावकाराच्या बायकोने आपल्या मुलांचे नुकसान केले आहे. म्हणून गरुडाने तिच्यावर हल्ला केला पण सावकाराच्या पत्नीने त्याला थांबवले आणि सांगितले की, तिने मुलांचे रक्षण केले आहे. जेव्हा गरुडाला हे सत्य कळले तेव्हा तो म्हणाला की तुम्ही माझ्या मुलांचे रक्षण केले आहे, तर मला सांगा की मी तुम्हाला कशी मदत करू? तेव्हा सावकाराच्या पत्नीने गरुडाला सांगितले, की ती सोना या धोबीणीच्या शोधात निघाली आहे, ती कुठे राहते हे सांगितले तर खूप उपकार होतील. गरुड सावकाराला सोना धोबीणीच्या गावी घेऊन गेला. सोना धोबीण यांना सात मुले आणि सुना होत्या. पण घरातील कामावरून सूनांमध्ये भांडण व्हायचे. सावकाराच्या पत्नीला यावर उपाय सुचला आणि रोज रात्री सगळे झोपले की ती गुपचूप सोना धोबिणीच्या घरी जायची आणि घरातील कामे करून निघून जायची. असे बरेच दिवस चालले असताना एके दिवशी सोना धोबीन लपून बसून सर्व काही पाहिले. सावकाराची पत्नी निघून जाऊ लागली तेव्हा धोबीणीने तिला पकडले आणि विचारले की तू कोण आहेस आणि तू अशी घरची कामे करून का निघून जातेस. सावकाराची पत्नी म्हणाली की मी सर्व काही सांगेन पण आधी वचन दे की सर्व सत्य जाणून घेऊन तू मला मदत करशील. सोना धोबीणीने सावकाराच्या पत्नीला वचन दिले. सावकाराच्या पत्नीने घडलेला सगळा प्रकार सोना धोबिणीला सांगितला आणि तिला सोबत यायला सांगितले.

# सोमवती अमावास्या २०२६ : यंदाचा अधिक मास आज संपणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय पंचांग आणि ज्योतिषशास्त्रामध्ये अमावास्या तिथीला आणि त्यातही सोमवारी येणाऱ्या सोमवार अमावास्येला अत्यंत पवित्र व महापुण्यदायी मानले जाते. यंदाची सोमवती अमावास्या सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी असून, ती विशेष महत्त्वाची ठरणारी आहे. कारण या दिवशी ज्येष्ठ अधिक मासाची सांगता होत असून, निज ज्येष्ठ मास सुरू होणार आहे.

अमावास्या रविवार, दि. १४ जून २०२६ रोजी दुपारी १२.२० मिनिटांनी अमावास्येला प्रारंभ होणार असून, सोमवार, दि. १५ जून २०२६ रोजी सकाळी ८.२४ मिनिटांनी समाप्त होईल. ज्योतिषीय नियमांनुसार अमावास्येची उदयतिथी १५ जून रोजी असल्याने सोमवती अमावास्या १५ जून रोजीच ग्राह्य धरली जाईल. या मुहूर्तावर अधिक मासाचे पर्व संपणार असून, भगवान विष्णू आणि देवाधिदेव महादेव यांच्या कृपेने सोमवती अमावास्येला १२ राशींच्या आयुष्यात कोणते मोठे बदल घडतील ते जाणून घेऊ.

**मेष :** या राशीच्या लोकांसाठी अधिक मास संपून निजय ज्येष्ठ मास सुरू होण्याचा काळ आर्थिक प्रगतीचे नवे मार्ग उघडणारा ठरेल. सोमवती अमावास्येच्या प्रभावाने जुनी रेंगाळलेली कामे अचानक गती पकडतील आणि नशिबाची साथ लाभेल. व्यवसाय किंवा नोकरीच्या ठिकाणी तुमच्या निर्णयक्षमतेचे कौतुक होईल. मात्र, घाईगर्दीत कोणतेही मोठे आर्थिक निर्णय घेणे टाळावे. आरोग्यामध्ये सुधारणा होईल आणि कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील.

**वृषभ :** या राशीच्या लोकांसाठी हा काळ वैयक्तिक आयुष्यात मोठे आणि सकारात्मक बदल घेऊन येणारा आहे. उत्पन्नाचे स्त्रोत वाढतील आणि अचानक योग निर्माण होतील. नोकरी शोधणाऱ्या लोकांना १५ जून २०२६ नंतर त्यंत चांगल्या संधी किंवा नवीन ऑफर मिळण्याची शक्यता आहे. जोडीदारासोबतचे जुने मतभेद मिटतील आणि वैवाहिक जीवनात गोडवा परतेले.

**मिथुन :** या राशीच्या लोकांनी या काळात आपल्या खर्चावर विशेष नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. मानसिक अस्वस्थता किंवा कामाचा अतिताण जाणवू शकतो. त्यामुळे

## 'या' राशींना अधिकाधिक फळ देऊन जाणार





वादविवादातून दूर राहिलेलेच बरे ठरेल. धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यात तुमची ओढ वाढेल. ज्यामुळे मनाला एक वेगळी शांतता आणि ऊर्जा लाभेल. नवीन गुंतवणुकीचा विचार करत असाल, तर तज्ज्ञांचा सल्ला घेतल्याशिवाय पुढे पाऊल टाकू नका.

**कर्क :** या राशीच्या लोकांसाठी अधिक ज्येष्ठ मासाची समाप्ती अनेक चिंतांमधून मुक्ती देणारी ठरणार आहे. या काळात तुमची सामाजिक प्रतिष्ठा वाढेल आणि रखडलेले कंत्राट किंवा सरकारी कामे मार्गी लागतील. मित्रांचे आणि हितचिंतकांचे पूर्ण सहकार्य लाभल्यामुळे व्यवसायात अपेक्षित नफा सहज कमावता येईल. विद्यार्थ्यांसाठी हा काळ अत्यंत अनुकूल असून, अभ्यासात एकाग्रता वाढेल.

**सिंह :** या राशीच्या लोकांसाठी निज ज्येष्ठ मासाची सुरूवात करिअरमध्ये मोठी झेप घेण्याची सुवर्णसंधी घेऊन येईल. कामाच्या ठिकाणी वरिष्ठांकडून तुमच्या कामाची दखल घेतली जाईल आणि पदोन्नतीचे मार्ग मोकळे होतील. कौटुंबिक जबाबदाऱ्या चोख पार पाडल्यामुळे आई-वडिलांचे आशीर्वाद आणि पाठिंबा तुम्हाला लाभेल. नवीन मालमत्ता किंवा वाहन खरेदीचे तुमचे स्वप्न या काळात साकार होऊ शकते.

**कन्या :** या राशीच्या सोमवती अमावास्या भाग्योदय करणारी ठरेल. विशेषतः लांबच्या प्रवासाचे योग येतील. उच्च शिक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना या काळात अत्यंत सकारात्मक बातम्या ऐकायला मिळू शकतात. पितृदोष निवारणासाठी हा काळ उत्तम असून, कुटुंबातील जुने वाद किंवा जमिनीचे प्रश्न मिटतील. तुमच्या हातून काही धार्मिक किंवा सामाजिक कार्य घडल्यामुळे समाजात मान-सन्मान वाढेल.

**तूळ :** या राशीच्या लोकांनी या अमावास्येच्या काळात आरोग्याबाबत आणि वाहने चालविताना विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. अचानक उद्भवणाऱ्या समस्यांमुळे मनात विनाकारण भीती किंवा अस्वस्थता निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. व्यवसायात भागीदारीत काम करताना पारदर्शकता ठेवा अन्यथा आर्थिक किंवा गैरसमज होऊ शकतात. वडिलांच्या प्रकृतीची काळजी घ्या आणि त्यांच्यासोबत वेळ घालविण्याचा प्रयत्न करा.

**वृश्चिक :** या राशीच्या लोकांसाठी हा काळ भागीदारीच्या व्यवसायात आणि वैवाहिक नात्यात मोठे यश देणारा ठरेल. तुमच्या जोडीदाराच्या नशिबाने तुम्हाला काही आर्थिक फायदा होऊ शकतो किंवा संयुक्त मालमत्तेतून लाभ मिळेल. नवीन व्यावसायिक करार करण्यासाठी किंवा नवीन भागीदारी सुरू करण्यासाठी १५ जून २०२६ नंतरचा काळ अत्यंत शुभ आहे. जुने मित्र भेटल्यामुळे जुन्या आठवणींना उजाळा मिळेल आणि मन प्रसन्न राहील.

**धनु :** या राशीच्या लोकांसाठी हा काळ शत्रूंवर आणि प्रलंबित कोर्ट-कचेरीच्या कामात विजय मिळवून देणारा ठरेल. नोकरमीमध्ये बदल करू इच्छिणाऱ्या लोकांसाठी हा महिना अत्यंत अनुकूल असून, नवीन संधी चालून येतील. जुन्या कर्जातून किंवा आर्थिक विवंचनेतून हळूहळू मार्ग निघेल आणि उत्पन्नात सातत्य राहील. खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा अन्यथा पोटाचे किंवा पचनाचे किरकोळ त्रास होऊ शकतात.

**मकर :** या राशीच्या लोकांसाठी हा काळ प्रेमसंबंध आणि संततीच्या बाबतीत अत्यंत सुखद आणि अनुकूल ठरणारा आहे. विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता वाढेल आणि स्पर्धा परीक्षांमध्ये त्यांना अपेक्षित यश मिळण्याचे योग आहेत. आर्थिक क्षेत्रात केलेली जुनी गुंतवणूक आता चांगला परतावा देण्यास सुरूवात करेल. ज्यामुळे बँक बॅलन्स वाढेल. कला, क्रीडा आणि लेखन क्षेत्रातील व्यक्तींना त्यांच्या कौशल्याचे प्रदर्शन करण्याची उत्तम संधी मिळेल.

**कुंभ :** या राशीच्या लोकांसाठी हा काळ घरगुती सुख-सुविधा आणि कौटुंबिक शांतता वाढविणारा ठरेल. घरात नवीन वस्तूंची खरेदी होऊ शकते किंवा घराच्या नूतनीकरणाचे काम तुम्ही हाती घेऊ शकता. आईकडून किंवा मातृपक्षाकडून विशेष सहकार्य आणि प्रेम लाभेल. ज्यामुळे मनातील चिंता दूर होतील. कामाच्या ठिकाण तुमचे वर्चस्व वाढेल आणि सहकाऱ्यांचे सहकार्य मिळाल्यामुळे कामाचा ताण कमी होईल.

**मीन :** या राशीच्या लोकांचा आत्मविश्वास आणि पराक्रम या काळात कमालीचा वाढलेला पाहायला मिळेल. लहान भावंडांसोबतचे नाते अधिक घट्ट होईल आणि त्यांच्याकडून तुम्हाला शुभ वार्ता ऐकायला मिळतील. नोकरी किंवा व्यवसायाच्या निमित्ताने केलेले छोटे प्रवास अत्यंत फायदेशीर आणि आर्थिक सुबत्ता आणणारे ठरतील. तुमच्या बोलण्यातील गोडव्यामुळे तुम्ही अवघड कामेही समोरच्या व्यक्तीकडून सहज करून घ्याल.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)